दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २२७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१७ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचा पहिला टप्पा मार्च २०२३ पर्यंत पूर्ण होणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक जनतेला प्रेरणादायी ठरेल असा विश्वास व्यक्त करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्मारकाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याची ग्वाही दिली. स्मारकाच्या पहिल्या टप्प्याचे काम मार्च २०२३ पर्यंत पूर्ण होणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. स्मारकाच्या कामाची पाहणी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.**

दादर येथील महापौर बंगला परिसरात सुरू असलेल्या स्मारकाच्या कामाची पाहणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. यावेळी त्यांनी आढावा बैठकही घेतली. बैठकीस मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार राहूल शेवाळे, आमदार दिलीप लांडे, मंगेश कुडाळकर, माजी मंत्री रामदास कदम, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त एस.व्ही.आर श्रीनिवास उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आज या स्मारकाच्या कामाची केली. त्याच्या पहिल्या टप्प्याचे काम ५० टक्क्यांपेक्षा अधिक झाले असून मार्च २०२३ पर्यंत पहिला टप्पा पूर्ण करण्यात येईल. बाळासाहेबांच्या स्मारकातून जनतेला प्रेरणा मिळणार असून त्यासाठी त्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. स्मारकाचा दुसरा टप्पा पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या बाबींची पूर्तता करण्यात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.


स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक जनतेचे असून ते लवकरात लवकर पूर्ण करून जनतेला हे स्मारक समर्पीत करण्याचा मानस असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. स्व. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाच्या महापौर निवासस्थानाचे वारसा संर्वधन व जतन करणे, प्रवेशद्वार इमारतीचे बांधकाम इंटरप्रिटेशन सेंटरचे बांधकाम प्रशासकीय इमारतीचे बांधकाम इ. कामे प्रगतीपथावर आहे. या स्मारकाच्या पहिल्या टप्प्यातील ५८.३५ टक्के काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्यातील कामांना नुकतीच सुरुवात झाली आहे असं श्रीनिवास यांनी सादरीकरणा दरम्यान सांगितले.



# राष्ट्रवादीच्या स्टार प्रचारकांमधून अमोल कोल्हेंचा पत्ता कट, नाराजीच्या चर्चांना खतपाणी

**दै.रायगड नगरी । पुणे**

शिरुर लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादीचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांची पक्षाचे स्टार प्रचारक म्हणून ओळख आहे. मात्र गुजरात निवडणुकीसाठी जाहीर झालेल्या स्टार प्रचारकांच्या यादीतून त्यांचे नाव वगळण्यात आले आहे. गुजरात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीने स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली, मात्र अमोल कोल्हे यांचं नाव नसल्याने आता चर्चांना चांगलंच उधाण आल्याचं पहायला मिळत आहे.



गुजरात निवडणुकीसाठी राष्ट्रवादीकडून अध्यक्ष शरद पवार यांच्यासह अजित पवार, सुप्रिया सुळे, जयंत पाटील, छगन भुजबळ, प्रफुल पटेल, सुनील तटकरे, जितेंद्र आव्हाड, फौजिया खान, सोनिया दुहान यांच्यासह ३१ जणांची यादी जाहीर करण्यात आली आहे. मात्र २०१९ मध्ये आपल्या भाषणाने ज्यांनी स्वतःची नव्याने ओळख निर्माण केली, जनतेच्या मनावर राज्य केले, राष्ट्रवादीला नवा चेहरा दिला, त्या डॉ. अमोल कोल्हे यांचे नाव मात्र या यादीत नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ते खरंच नाराज असल्याच्या चर्चांना आता दुजोरा मिळू लागला आहे. काही दिवसांपूर्वी शिर्डी येथे राष्ट्रवादीचे अधिवेशन पार पडले होते, तेव्हा डॉ. अमोल कोल्हे हे गैरहजर होते. आजारी असल्याचे कारण त्यावेळी देण्यात आले होते. त्यामुळे कोल्हे नाराज असल्याच्या चर्चा देखील रंगू लागल्या होत्या. शिवाय याबाबत अमोल कोल्हे यांनी अद्यापही स्पष्टीकरण दिलेलं नाही.

त्यातच आज राष्ट्रवादीकडून जाहीर झालेल्या स्टार प्रचारकांच्या यादीतून अमोल कोल्हे यांना वगळल्याने आता राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगू लागली आहे. लवकरच राजकीय भूकंप होण्याच्या हालचाली होणार का, अशी कुजबूज सुरु झाली आहे. याबाबत राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांकडून देखील कोणतीही माहिती अद्याप देण्यात आलेली नाही.

# नागाव उपसरपंच भुपेंद्र घरत यांच्यासह १० साथीदारांची उरण न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता

**दै.रायगड नगरी । उरण**

नागाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच भुपेंद्र घरत व त्यांच्या अन्य १० साथीदारांची विविध शस्त्रास्त्रांचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या खटल्यातून पुराव्याअभावी उरण न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे.

उरण पोलिसांनी ओएनजीसीच्या पीरवाडी येथील पिंचिंगचे बांधकाम सुरू असताना भुपेंद्र घरत यांनी त्यांच्या साथीदारांनी डंपर अडवून फिर्यादी वैभव कडू व त्यांच्या साथीदारांना परवाना असलेल्या फायटर रिव्हाल्वर, चॉपरचा धाक दाखवून शिवीगाळ करून धमकावून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याच्या आरोपावरून ८ ऑगस्ट २०20 रोजी उरण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी चौकशी पूर्ण झाल्यानंतर भुपेंद्र घरत, प्रथमेश पाटील, विनित बोंबले, अमित म्हात्रे, प्रशांत पाटील, कल्पेश भोसले, समिर पाटील, मयुर भोईर, सागर म्हात्रे, मनिष पाटील, योगेश भोसले आदी ११ आरोपींच्या .../२

पनवेल बस स्थानक पुर्नबांधणी प्रकल्प....

# नागरिकांच्या उद्रेकाची वाट पाहू नका : भक्तीकुमार दवे

## विकासक आणि महामंडळ प्रशासनास धरले धारेवर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल प्रवासी संघाने पनवेल स्थानकाच्या पुनर्बांधणीचे प्रकल्पाच्या बाबत १६ मार्च २००९ पासून पाठपुरावा केलेला आहे. १४ वर्षे प्रामाणिकपणे पाठपुरावा केल्यानंतरसुद्धा कामास प्रत्यक्ष सुरुवात होत नसल्याचे पाहून या संघटनेने आंदोलनाची हाक दिली होती. पूर्णपणे बगैर राजकीय अशा या आंदोलनात बहुतांश राजकीय पक्ष आणि सेवाभावी संघटना सहभागी झाल्या होत्या. या आंदोलनाचे फलित म्हणजे राज्य परिवहन मंडळाच्या उप महाव्यस्थापक विद्या भिलारकर यांच्या समवेत विकासक आणि पनवेल प्रवासी संघाची बैठक मंगळवार दिनांक १५ नोव्हेंबर रोजी पार पडली. विकासक आणि महामंडळ प्रशासनास अभ्यासपूर्ण पद्धतीने धारेवर धरले असता हा प्रकल्प अद्यापही लाल फितीत गुरफटला असल्याचे दुर्दैवी चित्र समोर आले.



डॉ.भक्तीकुमार दवे यांच्या नेतृत्वाखाली पन–वेल प्रवासी संघाच्या शिष्टमंडळामध्ये कार्याध्यक्ष अभिजित पाटील,उपाध्यक्ष यशवंत ठाकरे, सचिव श्रीकांत बापट, रमेश जानोरकर, मंदार दोंदे, निलेश जोशी, गौतम अगरवाल आदी सहभागी झाले होते. सदरच्या कामाचे विकासक म्हणून ज्यांच्या समवेत करार झाला आहे त्या मे पनवेल मास ट्रान्झिट प्रोजेक्ट्स प्रा.ली. चे प्रोजेक्ट मॅनेजर यांच्या सह पूर्ण टीम उपस्थित होती. त्यांच्या म्हणण्यानुसार हा प्रकल्प बांधा व हस्तांतरित करा या स्वरूपाचा असून सुद्धा राज्य शासन हा प्रकल्प सामान्य पद्धतीचा पुनर्बांधणी प्रकल्प म्हणून गृहीत धरत होत. अखेरीस पुणे येथील नोंदणी व मुद्रांक विभागाच्या कार्यालयात जाऊन न्यायिक लढाई देत सदरचा प्रकल्प बांधा व हस्तांतरित करा या स्वरूपाचा असल्याचे सिद्ध करण्यात चार वर्षे वाया गेली आहेत. ३४,५०० चौ.मीटर भूखंडावर राबविण्याच्या प्रकल्पाचे यापूर्वी विविध कारणांनी तीन आराखडे बनविले गेले आहेत. तूर्तास सदरच्या भूखंडावर १६,५०० चौ.मीटर वर एस टी पोर्टल उभारले जाणार असून १९,२५० चौ.मी. वर खासगी निवासी/वाणिज्य प्रकल्प निर्माण होणार आहे. परंतु सदरचा आराखडा राज्य परिवहन विभागाकडे मंजुरीसाठी दिला असल्याचे विकासकाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

प्रस्तावित आराखड्यात अजूनही सूचना दिल्या जाऊ शकतात. शिवाय महामंडळाच्या वाहन तळ मागणीस विकासक राजी नाही. राज्य परिवहन मंडळाच्या अनुमती प्राप्त झाल्यानंतर पनवेल महानगरपालिका,पर्यावरण,प्रदूषण नियंत्रण,वन विभाग,अशा अनेक अनुमत्या मिळविणे बाकी आहे, सगळ्या मंजुरी नंतर अर्थात एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया यांची अनुमती देखील तितकीच महत्वाची आहे. एकंदरीत लाल फितीत अडकलेला प्रकल्प, गर्द लाल फितीत अडकला आहे. विशेष लक्ष देण्याची गोष्ट म्हणजे मूळच्या २३५ कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे पाच वर्षे काम सुरु न झाल्याने मूल्य वर्धन होणार आहे. त्यासाठीच तर हा सगळा अट्टाहास नाहीना ? अशी शंका देखील उपस्थित होते.

> **२००९ साली पनवेल स्थानकातील जुनी इमारत पाडल्यानंतर या स्थानकात पुनर्बांधणी करण्याकरता आम्ही पाठपुरावा करत आ-होत. परंतु बांधा आणि हस्तांतरित करा या धरतीवरती बराच कालखंड कुणी कंत्राटदार तयार होत नव्हते, बऱ्याच अडचणींचा सामना करत कुठेतरी आता अंतिम आराखडा मंजुरी पर्यंत आपण येऊन ठेपलेले आहोत. दरम्यानच्या कालखंडात २३५ कोटी रुपये खर्च अपेक्षित असणाऱ्या या प्रकल्पावर आता साधारणपणे ४०० कोटीहून अधिक रक्कम खर्च करावी लागेल. पुनर्बांधणी प्रकल्पामध्ये उशीर होत असल्याकारणाने निश्चितच आता या प्रकल्पासाठी लागणारा खर्च वाढतो आहे.**
>
> **- विद्या भिलारकर, उप महाव्यवस्थापक (बांधकाम)**


# जेएनपीए कामगार संचालक पदाच्या निवडणुकीत दिनेश पाटील, रविंद्र पाटील विजयी

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीए बंदरात नव्याने झालेल्या प्राधिकरणातील संचालक म्हणून दोन कामगार संचालकाची निवडणूक काल मंगळवारी गुप्त मतदानाने पार पाडण्यात आली. या निवडणूकीचा निकाल रात्री जाहीर करण्यात आला आहे.

या निवडणुकीत जेएनपीटी एकता कामगार संघटनेला प्रथम क्रमांकाची तर जेएनपीटी वर्कर्स युनियनला द्वितीय क्रमाकांची मते मिळाल्याने या दोन्ही संघटनेचे प्रतिनिधी प्राधिकरणाच्या सदस्यपदी निवडले जाणार आहेत. यामध्ये एकता संघटनेचे दिनेश पाटील तर वर्कर्स युनियनचे रविंद्र पाटील यांची निवड होणार आहे. तर मागिल कित्येक वर्षे जेएनपीए कामगारांचे नेतृत्व करणारे कॉ.भूषण पाटील यांना कामगारांनी पराभवाची धूळ चारली आहे.

जेएनपीटीसह देशातील ११ प्रमुख बंदरातील विश्वस्त मंडळ बरखास्त करून त्याजागी केंद्र सरकारने २०२१ ला बंदर प्राधिकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर प्राधिकरणाच्या १३ पैकी दोन कामगारांचे प्रतिनिधी गुप्त मतदानाने निवडून केंद्रीय कामगार आयुक्तांच्या देखरेखेरी खाली काल मंगळवारी निवडणूक प्रक्रिया घेण्यात आली. घेतली. यावेळी जेएनपीए मधील एकूण ६५२ मतदारांपैकी ६४७ कामगारांनी मतदान केले. तर एक मत अवैध ठरले. मतदानाची ही टक्केवारी



९३.३३ टक्के होती. यामध्ये एकता कामगार संघटनेला २९१, वर्कर्स युनियनला १६१, न्हावा शेवा बंदर कामगार संघटनेला १४३ तर चौथ्या संघटनेला ५१ मते पडली आहेत.

निवडणुकीच्या निकाल नंतर विजयी झालेल्या जेएनपीटी एकता कामगार संघटनेचे दिनेश पाटील व जेएनपीटी वर्कर्स युनियचे रविंद्र पाटील यांच्या कामगारांनी आनंद व्यक्त केला.

# माणगावमधील वक्रतुंड हॉटेलमध्ये जुगार क्लब पुन्हा जोमात सुरू

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगांव भर बाजारपेठेत वक्रतुंड हॉटेलमध्ये राजरोस पणे जूगार क्लब चालू असताना दि,५ नोव्हेंबर रोजी माणगांव पोलिसांनी धाड टाकून एकूण ३९ जणांवर कारवाई केली होती. परंतु ती कारवाई खरी होती की जनतेची दिशा भूल करणारी होती. कारण त्या नंतर पुन्हा दोनच दिवसात हा जुगार अड्डा वक्रतुंड हॉटेल मध्ये पुन्हा चालू करण्यात आला या क्लब चालकाला




पोलिस खात्याची कुठल्याही प्रकारे भीती वाटत नाही. उलट हा छाती ठोक पणे सांगतो की मी खालपासून ते वरपर्यंत हप्ते देतो त्यामुळे आमचे कोणी वाकडे करू शकत नाही.

मंगळवार दि.१५ नोव्हेंबर रोजी जिल्हाचे एक वरिष्ठ पोलिस अधिकारी यांचा माणगांव मध्ये दौरा असता देखील हा जूगार क्लब अड्डा मात्र तेजीत चालू होता. या संदर्भात माणगांव पी.आय राजेंद्र पाटील याच्याशी संपर्क केला असता त्यांच्याशी संपर्क झाला नाही.

या भर बाजारपेठत वस्तीच्या ठिकाणी चालू असलेल्या जुगार अड्यावर स्थानिक पोलिस किवा रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक हा जुगार अड्डा चालू ठेवणार की कायमचा बंद करणार या कडे आता माणगांवकराचे लक्ष लागून राहिले आहे.

# सीईटीपी विरोधात शिरगांव ग्रामस्थ आक्रमक

## संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमण्याची मागणी



**दै.रायगड नगरी । महाड**

रासायनिक सांडपाणी वाहिनी वारंवार फुटून पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत आणि शेतीचे होणारे नुकसान आणि आरोग्याला निर्माण झालेला धोका यामुळे वैतागलेल्या शिरगाव ग्रामस्थानी आज सीईटीपी विरोधात निदर्शने करुन आपला रोष व्यक्त केला.

सोमवारी (१४ नोव्हेंबर) ही सांडपाणी वाहिनी शिरगाव नाक्याजवळ फुटली आणि हे सांडपाणी विहीरी आणि शेतापर्यंत जावून नुकसान झाले. दुर्गंधीचा त्रासही शिरगांव येथील नागरिकांना सहन करावा लागला. वारंवार असे प्रकार या पट्टयात घडत असल्यामुळे या परिसरातील ग्रामस्थांचा संयम सुटला आहे. त्यातूनच आज ही निदर्शने करण्यात आली.

शिरगांवचे सरपंच सोमनाथ ओझर्डे, पांडूरंग कोकरे, संतोष जाधव, रवि गजमल, सुरेश कदम, संजय रेशिम यांच्यासह या परिसरातील महिला आणि पुरूष ग्रामस्थ या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळेस ग्रामस्थांच्या वतीने एक निवेदन महाड शहर पोलिसांना .../२

# रायगड जिल्हा ग्रंथोत्सव 2022 उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१४ व दि.१५ नोव्हेंबर २०२२ रोजी सार्वजनिक ग्रंथालय व जिल्हा ग्रंथालय, डोंगरे हॉल, अलिबाग येथे आयोजित रायगड जिल्हा ग्रंथोत्सव २०२२ उत्साहात संपन्न झाला. या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन दि.१४ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी तथा रायगड ग्रंथोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिका श्रीमती इंदुमती जोंधळे यांनी प्रमुख मार्गदर्शन केले.

या ग्रंथोत्सवाच्या निमित्ताने दि.१४ व १५ नोव्हेंबर रोजी भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व बदललेले साहित्य प्रवाह(सहभाग: रमेश धनावडे, पल्लवी कदम व निर्मला फुलगावकर, संवादक: संतोष बोंद्रे), स्पर्धा परीक्षेची तोंड ओळख व आव्हाने (सहभाग: अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, श्रीवर्धन प्रांताधिकारी अमित शेडगे, उपजिल्हाधिकारी जनार्धन कासार, केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे निवृत्त सहाय्यक आयुक्त सुहास पाटील व अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंके, सूत्रसंचालन: जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप), समाज माध्यमांवरील लिखाणास साहित्य म्हणता येईल का(सहभाग: सुजाता पाटील, प्रसाद पेंडसे, श्रुती देसाई राजे व पराग बद्रिके), माझे वाचन आणि मी(सहभाग: जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, ललित व विनोदी साहित्यिक डॉ.रविंद्र तांबोळी, कोकण मराठी साहित्य परिषदेचे रायगड जिल्हा अध्यक्ष सुधीर शेठ, श्री.शाम जोगळेकर, मराठी साहित्य मंडळाचे रायगड जिल्हा अध्यक्ष राजेश थळकर, पद्मजा कुलकर्णी), रायगड जिल्ह्याच्या जडणघडणीतील वृत्तपत्रांचे व प्रसार माध्यमांचे योगदान(सहभाग: ज्येष्ठ पत्रकार रविंद्र बोडके, दै.पुढारी चे ब्युरो चीफ जयंत धुळप, ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर व झी २४ तास वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी प्रफुल्ल पवार, सूत्रसंचालन: महेश पोरे, दै.रत्नागिरी टाईम्स) या विषयांवरील परिसंवाद तसेच कवी संमेलन (अध्यक्ष: प्रा.श्री.एल.बी. पाटील, सहभाग: सुधीर नागले, अजित शेडगे, हेमंत बारटक्के, श्रेयस रोडे, जयपाल पाटील, नारायण पानावकर, संध्या दिवेकर, भावेश लोंढे, सुरेश भोपी, तेजस पाटील, संतोष राऊळ व चंद्रकांत पाटील), ज्येष्ठ साहित्यिका शांताबाई शेळके, शाहीर आण्णा भाऊ साठे, कवी वसंत बापट, कथाकार जी.ए.कुलकर्णी, कवी शंकर रामाणी, लेखक नाथ पै यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या साहित्यिक जीवनावर प्रकाश टाकणारा श्रुती बोंद्रे लिखित




व संतोष बोंद्रे दिग्दर्शित सांस्कृतिक कार्यक्रम गाठोडं... (अभिवाचन: डॉ.चंद्रकांत वाजे, ऋतुजा भगत, ॲड.रुची भगत, संतोष बोंद्रे, गीतगायन: श्रुती बोंद्रे व प्रतिक केळकर, वादक: रोहित वैशंपायन, हार्मोनियम व केदार आठवले, तबला), गझल मुशायरा (अध्यक्ष: श्री.ए. के. शेख, पनवेल, सहभाग: रोहिदास पोटे, सिद्धेश लखमादे, ज्योत्सना रजपूत, नागेश नायडू, सुभाष कटकदौंड, गंगाधर साळवी, हनुमंत शिंदे, मनाली कोनकर, दिपाली दिवेकर) अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी उभारण्यात आलेल्या पुस्तकांच्या स्टॉल्सनाही ग्रंथप्रेमींनी भेट देत उत्तम प्रतिसाद दिला. तसेच जिल्ह्यातील स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनींकरिता जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या गरुडझेप स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र व गरुडझेप पची माहिती देणारे स्टॉलही उभारण्यात आले होते.

यंदाच्या ग्रंथोत्सवातील विशेष बाब म्हणजे, यावेळी विविध आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थी-विद्यार्थीनींना या ग्रंथमेळ्यास भेट देण्याची संधी मिळाली. विविध क्षेत्रातील मान्यवरांचे विचार या आश्रमशाळेतील विद्यार्थी-विद्यार्थीनींना ऐकता आले.

ग्रंथोत्सवाच्या समारोप कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते निबंध स्पर्धा व पत्रलेखन स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच साहित्यातील विशेष योगदानाबद्दल रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातील शिपाई कर्मचारी श्री.हेमंत पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

# शेतकऱ्यांनी गिरविले बीज-प्रक्रियेचे धडे

**दै.रायगड नगरी । कर्जत**

युनायटेड वे मुंबईच्या जल संजीवनी प्रकल्प कर्जत अंतर्गत शेतकऱ्यांसाठी बीज प्रक्रिया करण्याचे प्रात्यक्षिक वारे ग्रामपंचायतमधील कुरुंग गावात तसेच अंभेरपाडा ग्रामपंचायत कार्यालय येथे आयोजित करण्यात आले.

समूह संघटक विवेक कोळी यांनी शेतकऱ्यांना बीजप्रक्रिया उपक्रमाची पार्श्वभूमी सांगितली आणि कृषि तज्ज्ञ जोएब दाऊदी यांनी बीज प्रक्रियेचे महत्त्व सांगून FIR (Fungicide, Insecticide,Rhizobium ) क्रम अर्थातच आधी बुरशीनाशकाची प्रक्रिया त्यानंतर कीडनाशक आणि सगळ्यात शेवटी रायझोबियम कल्चर उपचार करीत स्वतः प्रात्यक्षिक करून दाखविले.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे बीज प्रक्रिया करतांना सर्वप्रथम प्राधान्य आपल्या आरोग्याला द्यावे. उदा.रासायनिक किंवा जैविक साहित्यांच्या सरळ संपर्क आपल्या शरीराशी टाळावा. रसायनाचे वास घेणे, हाताने ढवळणे इ. करू नये. मास्क आणि हातमोजे यांचा वापर अनिवार्य करावा. प्रक्रिया केलेले बियाणे फक्त आणि फक्त पेरणीसाठी असून लहान मुल, जनावर इ.पासून दूर ठेवावे आणि जास्त काळ तसेच न ठेवता त्वरित सावलीत सुकवून पेरून द्यावे अशा महत्त्वाच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या.

# शेतकरी प्रक्षेत्र प्रशिक्षण व भेटीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत कृषी विभाग माणगाव यांच्यामार्फत शेतकरी प्रक्षेत्र प्रशिक्षण व भेटीचे पाच दिवसांचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणास तळेगाव दाभाडे येथील फुलशेती, कांदा व लसूण संशोधन केंद्र राजगुरुनगर, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, कृषी संशोधन केंद्र बाभळेश्वर, कृषीथॉन शेतकरी प्रदर्शन, नाशिक कृषी प्रक्रिया उद्योग व प्रगतशील शेतकरी इत्यादी ठिकाणास भेट देणार आहेत. तरी माणगाव, तळा, रोहा व पाली या तालुक्यातील प्राधान्याने इच्छुक महिला शेतकऱ्यांनी आपली नोंदणी संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे दि.१९ नोव्हेंबर २०२२ पूर्वी करावी.


महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

[illegible]
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: डीआरए-०५२२/प्र.क्र.१५५/२०२२/जाहिरात दिनांक: १६ नोव्हेंबर, २०२२


महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत खालील संवर्गातील पद भरतीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत:-

| जाहिरात क्रमांक | संवर्ग | एकूण पदसंख्या |
|---|---|---|
| १००/२०२२ | उप संचालक, सामान्य राज्य सेवा, गट-अ (नियोजन विभाग) | १३ |
| १०१/२०२२ | उप संचालक, बाष्पके, गट-अ बाष्पके संचालनालय (उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग) | ०४ |
| १०२/२०२२ | उप अभियंता (यांत्रिकी), महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा, गट-अ (जलसंपदा विभाग) | १० |
| १०३/२०२२ | अधिष्ठाता, महापालिका वैद्यक संस्था, गट-अ (बृहन्मुंबई महानगरपालिका) | ०१ |

२. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरावयाच्या पदांचा संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, प्रवर्गनिहाय तपशील, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, आरक्षण, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.
३. ऑनलाईन अर्ज https://mpsconline.gov.in या संकेतस्थळाद्वारे दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक ०८ डिसेंबर, २०२२ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.
४. आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.
ठिकाण : मुंबई. सह सचिव (जाहिरात), महाराष्ट्र लोकसेवा आयोग.


# रेल्वे प्रवासी संघ, मनसेच्या पाठपुराव्याला रोहेकरांची साथ, रोहा दिवा मेमुची वाढीव फेरी लवकरच सेवेत

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**



रोहे दिवा मेमु सेवा वाढवत लांबपल्याच्या गाड्यांचे रद्द केलेले थांबे पूर्ववत करावे यासाठी महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघ आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना, लोकशाही मार्गाने पाठपुरावा करत होते.यासंबंधी वेळोवेळी मध्य रेल्वे प्रशासनास निवेदने दिल्यानंतर सप्टेंबर महिन्यात सह्यांची मोहीम हाती घेण्यात आली होती. रोह्या मधून रेल्वे सेवा वाढावी ही प्रत्येक सर्वसामान्य रोहेकराची मनोमन इच्छा होती. त्यामुळे यासाठी होणाऱ्या प्रत्येक कृतीला रोहेकरानी भरभक्कम साथ दिली. याला आता यश येताना दिसत आहे.मनसेने यासाठी राबविलेल्या सह्यांच्या मोहिमेचे निवेदन मध्य रेल्वे चे अप्पर विभागीय व्यवस्थापक (वाहतूक) एच जी तिवारी यांना दिल्यानंतर ६ ऑक्टोंबर रोजी यासंबंधी प्रस्थाव दाखल केला. त्यानुसार १४ नोव्हेंबर रोजी मध्य रेल्वे ने रोहे दिवा मार्गावर नवीन मेमु फेरीचे वेळापत्रक जाहीर केले आहे.यामुळे आता लवकरच रोहेकरांसाठी सकाळी सव्वापाच नंतर अजून एक वाढीव फेरी उपलब्ध होणार असल्याचे या जाहीर केलेल्या पत्रावरून दिसत आहे.

कोरोना मुळे दोन वर्षे विस्कळीत व रोहेकरांसाठी गैरसोयीचे असणारे वेळापत्रक पुर्वपदावर यावे यासाठी महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघ अंतर्गत रोहे रेल्वे प्रवासी संघ व महाराष्ट्र नवनिर्माण सेना लोकशाही मार्गाने पाठपुरावा करत होते. यासाठी वेळोवेळी स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रशासनाकडे निवेदने देण्यात येत होती.अपुरी रेल्वे सेवा असल्यामुळे नोकरदार,व्यावसायिक व विद्यार्थी यांसह अन्य सर्वसामान्य प्रवाश्यांना अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत होता. महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुर्यकांता वाघमारे पुरुषोत्तम देशमुख ,के के मोहन , रामनरेश कुशवाह , महादेव सारसंबे , महेंद्र मोरे आदी पत्रकारांनी वेळोवेळी ह्या संदर्भात यांनीही मोलाचे सहकार्य केले , रोहे मधील रेल्वे सेवेच्या संबंधीत भेडसावणाऱ्या सर्व समस्यांच्या बाबत मध्य रेल्वे प्रशासनास निवेदने देत आंदोलन करण्याचा इशारा देण्यात येत होता.

मनसेचे रायगड जिल्हा सचिव अमोल पेणकर यांचे मार्गदर्शनाखाली रोहेकरांच्या मागण्या रेल्वे प्रशासना पर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वप्रथम सह्यांची मोहीम हाती घेण्यात आली. ही मोहीम तालुकाध्यक्ष अक्षय रटाटे, उपतालुकाध्यक्षसुरज मुटके , धाटाव विभाग अध्यक्ष महेश वाडकर, शहराध्यक्ष मंगेश रावकर, उपाध्यक्ष अमित पवार , महेश साळुंखे, सूर्यकांत वाघमारे व सर्व मनसैनीकांनी यशस्वी करत हजारो रोहेकरांच्या सह्या घेतल्या. यानंतर हे हजारो सह्यांचे निवेदन मुंबई येथील विभागीय व्यवस्थापक कार्यालयाला देण्यात आले. त्यावेळी रोहे मध्ये मेमु सेवा वाढत जलद गाड्या थांबल्या तर त्या प्रवाश्यांना फायदेशीर ठरत यामुळे रोहे शहराचे अर्थकारण कसे बदलेल ही भूमिका वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर मांडली. याची दखल रोहा वरुन दिव्यासाठी सुरु होणाऱ्या नवीन मेमु सेवेच्या वेळापत्रकाचे पत्र मध्य रेल्वे प्रशासनाने जाहीर केले आहे.

यानुसार सकाळी ६ वाजून ४० मिनिटांनी ही गाडी रोहा वरुन सुटेल तर दिव्या वरुन सायंकाळी ६ वाजून ४५ मिनिटांनी सुटेल व रोहा मध्ये रात्री ९ वाजून १० मिनिटांनी दाखल होणार आहे. आता फक्त हे वेळापत्रक जाहीर केले असून लवकरच ही मेमु सेवा रोहेकरांसाठी उपलब्ध होणार आहे. यामुळे रोहेकरांचा रेल्वे प्रवास सुखकर होत बाजारातील अर्थकारणावर ही चांगला परिणाम होणार आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सीईटीपी विरोधात शिरगांव ग्रामस्थ आक्रमक

देण्यात आले. सीईटीपीचे चेअरमन संभाजी पाठारे जर या ठिकाणी हजर राहणार नसतील तर त्यांची या पदावरून हकालपट्टी करण्यात यावी आणि औद्योगिक विकास महामंडळाने सीईटीपी ताब्यात घेवून प्रशासक नेमावा, शिरगांव नाका येथील प्राथमिक शाळा आणि पोलीस चौकीला नळ कनेक्शन देण्यात यावे, एमआयडीसी आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाने सीईटीपीविरोधात गुन्हा दाखल करावा, शिरगांव गावातील जे तरूण औद्योगिक वसाहतीमध्ये कामाला आहेत, त्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे, सांडपाण्यामुळे शेतीचे आणि पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे जे नुकसान होत आहे त्याची भरपाई सीईटीपीने करून द्यावी अशा मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी श्री. बोबडे आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपप्रादेशिक अधिकारी श्रीमती इंदिरा गायकवाड या निदर्शकांना सामोर्या गेल्या. त्यांच्याकडेही ग्रामस्थांनी याच मागण्या केल्या. या आंदोलनादरम्यान, शिरगाव नाक्यावर महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक मिलिंद खोपडे यांच्या नेतृत्वाखाली कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## १० साथीदारांची उरण न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता

विरोधात उरण न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्यात आला होता.

या फौजदारी खटल्याची सुनावणी मागील २१ महिन्यांपासून सुरू होती.मात्र सुनावणी दरम्यान सरकारी पक्षाला पुरेसे पुरावे सादर करता आले नाहीत.शिवाय फिर्यादीनेच उलटतपासणी दरम्यान असा काही प्रकार घडला नसल्याचे न्यायालयात सांगितले.त्यामुळे पुरेश्या पुराव्याअभावी उरण न्यायालयाचे न्यायदंडाधिकारी पी.एन.पठाडे यांनी ११ आरोपींचीही शिक्षाधिन आरोपातून निर्दोष मुक्तता केली आहे. सरकारी पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता ए.आर.कदम तर आरोपींतर्फे ॲड.अमर पाटील यांनी काम पाहिले.


**जाहीर नोटीस**

जाहीर नोटीस तमाम लोकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे नवीन पनवेल पश्चिम, ता.पनवेल जि. रायगड येथील, शॉप नं १,२,३,४ तळ मजला श्री स्मरण को.ऑप.हौ.सो.लि. प्लॉट नं. ४३, सेक्टर नं.०९, नवीन पनवेल पश्चिम ता. पनवेल जि. रायगड या मिळकतीचे दस्त ॲग्रीमेंट फोर सेल हे दस्त क्र. २७३१/२००६ दिनांक ०३ /०४/२००६ रोजी नोंदणी झालेला दस्त घरातून इतरत्र कुठेतरी हरवले आहेत. सदरचे कागदपत्रे कोणालाही, कुठेही सापडल्यास, आमच्याकडे जमा करावेत १. सौ. प्रियंका संजय पाटील २. श्री. संजय आत्माराम पाटील रा. माणघर ता. पनवेल. जि. रायगड

सही/-
संजय पाटील
०९९६७६९६७६९



Hon'ble Mujawar Court
Adv.Dnyaneshwar S. Kulkarni
Applicant Advocate

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION, AT PANVEL
CIVIL M.A. NO.1566 OF 2022
Exh : 8/D
N.D.21/12/2022

1) Jayalakshmi Sunkara
Aged 82 Year, Occupation : None
2) Mrs.Venkata Anjani Devi Sunkara
Aged 46 Year, Occupation : None
3) Harshavardhan Sunkara
Aged 18 Year, Occupation : Student
4) Harshini Sunkara
Aged : 18 Year, Occupation : Student
Applicant No.1 to 2 Residing at : C-603
Hazel Rosewood Heights,
Plot No.270, Sector 10, Kharghar,
Tal-Panvel, Dist-Raigad 410206 Applicants
V/s
None Respondent

All the public is informed by this notice inform that, Late.Srinivasa Vara Prasad Sunkara died at Nair Municipal Hospital and Medical Collage on dt. 02/07/2021 and Jayalakshmi Sunkara and others 3 have made an application for Heirship of Late.Srinivasa Vara Prasad Sunkara.

The applicant viz ; Jayalakshmi Sunkara and Others 3 are legal heirs of Late.Srinivasa Vara Prasad Sunkara. If any person has any objection to their status being legal heirs of Late.Srinivasa Vara Prasad Sunkara. He/She must appear with the objection on or before 21 st December, 2022 before this Court. If appropriate objection is not taken during this time. The court will take immediate action to obtain evidence for Jayalakshmi Sunkara and Others 3 rights, and if they prove that they are legal Heirs of Late.Srinivasa Vara Prasad Sunkara the Heirship certificate shall be issued in favour of Applicants.

Date 16/11/2022 On the day I gave my sign and Court Stamp.

Sd/- Jr.Clerk Hon Court S.D. Panvel | Court Seal | Sd/- Asst.Suprident. Hon Court S.D. Panvel



अर्जदारतर्फे वकील : अनंत देवजी पाटील

**जाहीर नोटीस**

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण साो.रायगड यांचे कोर्टात
मो.अप.क्लेम नं.२/२०२०
नि.नं.१८/ड
ने.ता.१६/१२/२०२२

हरिश्चंद्र भागू शिंदे वगैरे १ अर्जदार
विरुद्ध
१) रितेश आर इनामदार
२) ICICI लोम्बार्ड जनरल इन्श्युरन्स कं.लि. सामनेवाला
प्रति,
सामनेवाला नं. १) रितेश आर इनामदार
रा.परळी सुधागड, परळी,
जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६

दि.१४/१२/२०१९ रोजी रात्री ११.१० वाजण्याच्या सुमारास मौजे : चिकणी गावचे हद्दीत गुलमोहर हॉटेलपासून उत्तरेस सुमारे १५० फुटावर रेल्वे ब्रिजचे अलिकडे, नागोठणे पोलीस ठाणे, ता.रोहा, जि.रायगड यांच्या हद्दीत अपघात घडला. सदर अपघातामध्ये अर्जदार नं.१ व अर्जदार नं.२ यांचा मुलगा जयेश हरिश्चंद्र शिंदे हा मयत झालेला आहे. सदर अपघातामध्ये टेम्पो (कंटेनर) क्र.एम.एच.०६/बी.डब्ल्यू २८५० वरील चालक हा जयेश हरिश्चंद्र शिंदे यांच्या मरणास कारणीभूत ठरले आहेत. म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता अंदाजे रु.४०,००,०००/- चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दिनांक १६/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.११/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक जि.न्या.रायगड-अलिबाग | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक जि.न्या.रायगड-अलिबाग



मा.गोडसे साो.कोर्ट
ॲड.संगीता चेतन मोरे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर साो.यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६३९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१७/१२/२०२२

विरेंद्रकुमार राधेश्याम मिश्रा वगैरे अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.राधेश्याम सुखदेव मिश्रा त्यांचे दि.२९/१२/२०२० रोजी हिरानंदानी फोर्टीस हॉस्पिटल वाशी मुंबई येथे निधन झाले आहे. कै.राधेश्याम सुखदेव मिश्रा यांचे मृत्यूपश्चात अर्जदार नं.१ विरेंद्रकुमार राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.२ राजेंद्रकुमार राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.३ संजयकुमार राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.४ सवारीदेवी राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.५ सुनितादेवी सुमित दुबे पुर्वाश्रमीची राधेश्याम मिश्रा ६ राज कुमारी विनय देव शुक्ला पुर्वाश्रमीची राज कुमारी राधेश्याम मिश्रा, हेच कायदेशीर वारस आहेत.

कै.राधेश्याम सुखदेव मिश्रा यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| मौजे | मिळकत | क्षेत्र |
|---|---|---|
| सेक्टर-७, नवीन पनवेल (पु.), ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६ | बिल्डींग नं.ई-११०, फ्लॅट नं.३, तळमजला, तेजेमय सोसायटी, सिडको कॉलनी, सेंट जोसेफ हायस्कूल जवळ, सेक्टर-७, नवीन पनवेल | १७.२०० चौ.मी. |

वरील मिळकतीस कै.राधेश्याम सुखदेव मिश्रा यांचे मृत्यूपश्चात अर्जदार नं.१ विरेंद्रकुमार राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.२ राजेंद्रकुमार राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.३ संजयकुमार राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.४ सवारीदेवी राधेश्याम मिश्रा, अर्जदार नं.५ सुनितादेवी सुमित दुबे पुर्वाश्रमीची सुनितादेवी राधेश्याम मिश्रा, ६ राज कुमारी विनय देव शुक्ला पुर्वाश्रमीची राज कुमारी राधेश्याम मिश्रा, हेच कायदेशीर वारस आहेत. वरील मिळकतीस वरील नमूद अर्जदारांची नावे लावण्याचे असल्यामुळे वरील अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरच्या अर्जास इतर अन्य कोणाचीही हरकत असल्यास अथवा अर्जदार व सामनेवाला व्यतिरिक्त अन्य कोणी कायदेशीर वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या मे.कोर्टात हजर राहून लेखी हरकत कागदपत्र व पुराव्यांसह घ्यावयाची आहे.

तरी या नोटीशीद्वारे जाहीर करण्यात येते की, विहित मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीप्रमाणे वारसांना दाखला देण्यास येईल. तद्नंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

आज दि.१६/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## नवनाथ नगर झोपडपट्टीच्या मागे आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील पनवेल रेल्वेस्टेशन रोडवरील नवनाथ नगर झोपड्पट्टीच्यामागे एका अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आला असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ६० ते ६५ वर्षे, उंची अंदाजे ५ फूट, रंग काळा, डोक्याचे व दाढी मिशीचे केस काळे-पांढरे आणि वाढलेले, अंगावर कपडे नाहीत या इसम बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्रमांक-०२२-२७४५२३३३ किंवा परि.पोलीस उपनिरीक्षक अमोल चौगले यांच्याशी संपर्क साधावा.

## चिरनेर शाळेत विद्यार्थी गुणवत्तेचा ध्यास माता पालकांसह करू विद्यार्थ्यांचा विकास हा नाविन्यपूर्ण उपक्रम

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्रार्थमिक शाळा चिरनेर येथे निपुण भारत अभियाना अंतर्गत माता पालक गटांची स्थापना करण्यात आली आहे.विद्यार्थ्यांचा विकास घडवून येण्यासाठी प्रथम माता पालकांना सक्षम बनवले पाहिजे. हा हेतू लक्षात घेऊन शाळेतील उपक्रमशील शिक्षिका सौ. चैताली म्हात्रे यांनी हा नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला असून या उपक्रमाला माता पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला आहे.

जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी शहरी भागा प्रमाणे ग्रामीण भागातील महिलांनी प्रथमतः सक्षम होणे गरजेचे आहे.त्यामुळे आता महिलांनी चुळ आणि मुलं न सांभाळता घराबाहेर पडून शैक्षणिक क्षेत्राबरोबरच इतर ही विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी कशा प्रकारे करु शकतो या कडे स्वत: लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे.असे आवाहन निपुण भारत अभियानांतर्गत माता पालक गटात सहभागी झालेल्या महिला भगिनींना चिरनेर प्राथमिक शाळेच्या शिक्षिका सौ. चैताली म्हात्रे यांनी केले.

या उपक्रमांतर्गत उरण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी प्रियांका पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माता पालकांसाठी विविध उपक्रम शाळेत घेतले. विद्यार्थ्यांमध्ये बदल घडून आणण्यासाठी कोणकोणते उपक्रम मातांनी घरी घेतले पाहिजे यासाठी ही मार्गदर्शन केले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी उरण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी प्रियंका पाटील यांनीही मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक प्रविण म्हात्रे यांचे ही प्राथमिक शाळेच्या शिक्षिका सौ. चैताली म्हात्रे व माता पालकांना सहकार्य लाभले.

# चार ग्रामपंचायतींच्या निवडणुकांनंतर आता १६ ग्रामपंचायतींमध्ये निवडणुकांची रणधुमाळी

## थेट सरपंच पदामुळे होणार अर्थकारणाचे राजकारण

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील चार ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा निकाल महाविकास आघाडी विरूध्द शिवसेना शिंदेगट अशा लढतीनंतर तीन शिंदे गटाच्या अधिपत्याखाली आल्याची घोषणा आ.भरत गोगावले यांनी केल्यानंतर तुर्भे खोंडा ग्रामपंचायतीअंतर्गत ग्रामस्थ विकास आघाडीने या तीन ग्रामपंचायतींमध्ये नसल्याचे जाहीर केले. यामुळे शिंदे गटाकडे दोन तर महाविकास आघाडीकडे एक आणि एक ग्रामस्थ विकास आघाडीकडे असे निकालाचे स्वरूप झाले. सप्टेंबर २०२२ मध्ये मुदत संपलेल्या १६ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांना आता पुन्हा महाविकास आघाडी विरूध्द बाळासाहेबांची शिवसेना सामोरे जाणार असल्याने चार निवडणुकांप्रमाणे या १६ निवडणुकांमध्येही थेट सरपंच पदामुळे होणार अर्थकारणाचे राजकारण होण्याचे संकेत स्पष्ट दिसून येत आहेत.

पोलादपूर तालुक्यातील भोगाव खुर्द, बोरघर, चांभारगणी बुद्रुक, दिविल, गोळेगणी, कालवली, कापडे खुर्द, कोतवाल बुद्रुक, कोतवाल खुर्द, धामणदिवी, लोहारे, ओंबळी, पैठण, पार्ले, परसुले आणि उमरठ या ग्रामपंचायतींची मुदत गेल्या सप्टेंबर २०२२ मध्ये संपुष्टात आली असून यापैकी भोगाव खुर्दमध्ये शिवसेना, बोरघरमध्ये शिवसेना शेकापक्ष, चांभारगणी बुद्रुकमध्ये शिवसेना, दिविलमध्ये शिवसेना, गोळेगणीमध्ये शिवसेना, कालवलीमध्ये शिवसेना, कापडे खुर्दमध्ये शिवसेना, कोतवाल बुद्रुकमध्ये भाजप-शिवसेना, कोतवाल खुर्दमध्ये शिवसेना, लोहारेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस, धामणदिवी व ओंबळी काँग्रेस, पैठणमध्ये शिवसेना, पार्लेमध्ये शिवसेना, परसुलेमध्ये शिवसेना आणि उमरठम ध्येदेखील शिवसेना पक्षाचे अधिपत्य होते.

यंदा मात्र, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे आणि बाळासाहेबांची शिवसेना असे शिवसेनेमध्ये दोन गट सक्रीय झाल्याने चित्र बदलण्याची परिस्थिती सकृतदर्शनी दिसून येत आहे.

या प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये काँग्रेस पक्षाने विरोधी पक्षाची भुमिका पार पाडली असल्याने आता शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाने महाविकास आघाडीचा धर्म पाळल्यास काँग्रेसच्या सोबतीने सत्ताकारण बदलण्यात यश येण्याची शक्यता आहे. भाजपने पार्ले, कोतवाल बुद्रुक आणि कोतवाल खुर्दमध्ये शिंदे गटासोबत जाण्याची भुमिका घेतल्यास निकाल पुर्वीप्रमाणेच राहण्याची शक्यता कमी आहे.

गेल्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये थेट सरपंचपदाची निवडणुक नसल्याने यंदा झालेल्या पहिल्या टप्प्यातील वझरवाडी, तुर्भे बुद्रुक, तुर्भे खोंडा आणि तुर्भे खुर्द या चार ग्रामपंचायतींच्या निवडणुकांवेळी पोलादपुर तालुक्यातील आतापर्यंतचा थेट सरपंचपदासाठीचा सर्वाधिक खर्च झाल्याची माहिती प्राप्त झाली असून या महिनाअखेरीस पोलादपूर तालुक्यातील दुसऱ्या टप्प्यातील १६ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाल्यानंतर पहिल्या टप्प्यापेक्षाही अधिक खर्च थेट सरपंचपदासाठी होण्याची परिस्थिती दिसून येणार आहे.

गेल्या पंचवार्षिक निवडणुकीमध्येदेखील आगामी १६ ग्रामपंचायतींच्या थेट सरपंच पदासाठीची निवडणूक झाली असल्यामुळे आता या निवडणुकीमध्ये वारेमाप खर्च होण्याची लक्षणं दिसून येत असताना आगामी रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांची ही पूर्वतयारी मानल्यास येत्या काळात थेट सरपंच पदांसह पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या उमेदवारांना मतदार आणि प्रचार यंत्रणांवर सढळहस्ते खर्च करावा लागण्याची चिन्हे दिसून येत आहेत. त्यामुळे मतदार आणि संभाव्य उमेदवारांनीदेखील राजकीय पक्षांकडून अर्थकारणाच्या अपेक्षेतून राजकारणाची दिशा ठरविल्यास या टप्प्याच्या ग्रामपंचायत निवडणुकीचे स्वरूप पूर्णपणे वेगळे असण्याचे चित्र दिसत आहे.

## माणगांव पोलीस ठाण्यात बसविले सॅनिटरी नॅपकिन मशीन

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**




माणगांव पोलीस नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. अनेक सामाजिक जनजागृतीपर उपक्रम माणगांव पोलिसांतर्फे राबविले जातात. असाच एक स्तुत्य उपक्रम माणगांव पोलीसांनी राबविला असून पोलीस ठाणे येथे सॅनिटरी नॅपकिन मशीन बसविण्यात आले आहे. पोलीस ठाण्यात कामानिमित्त व आपल्या समस्या निवारणासाठी आलेल्या तक्रारदार गोरगरीब गरजवंत तसेच आदिवासी महिलाभगिणींना देखिल याचा सहजी लाभ मिळणार आहे. अत्यंत अल्प किंमती-त उच्च-प्रतिचे, जागतिक मान्यताप्राप्त आरोग्य संघटना डब्लु.एच.ओ. ने शिफारस केलेले हे डबल कोटिंग सॅनिटरी नॅपकिन महिलांच्या आरोग्याचे दृष्टीकोनातुन निर्धोक असल्याची माहीती ह्युमॅनिटी फेडरेशन संस्थापक प्रशांत जोशी यांनी दिली आहे.

माणगांव पोलीस व ह्युमॅनिटी युनायटेड फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ नोव्हेंबर रोजी रायगड जिल्ह्यातील माणगांव पोलीस ठाणे येथे महिला मासिक पाळी स्वच्छता मुद्द्यावर मार्गदर्शन देखिल करण्यात आले. मासिक पाळीच्या संदर्भात नेहमीच लाज, संकोच बाळगल्याने महिला व युवतींना अनेक गंभीर आणि इतर समस्याना तोंड द्यावे लागते. मासिक पाळीतील मनातील लज्जा, संकोचची जागा गर्व आणि आनंदात बदलण्या-साठी ह्युमॅनिटी युनायटेड फेडरेशन द्वारा हे अभियान सुरू केले आहे.

रायगडचे पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनात तसेच वरिष्ठ पोलिस निरिक्षक राजेंद्र पाटील यांच्या पुढाकाराने माणगांव पोलीस ठाण्यात बसविण्यात आलेल्या सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीनच्या उदघाटन प्रसंगी डॉक्टर साकोलीकर, महिला पोलीस उप निरीक्षक अस्मिता पाटील, ह्युमॅनिटी फेडरेशन संस्थापक प्रशांत जोशी, कोकण विभाग अध्यक्ष सचिन शिंदे, पो. शि. रामनाथ डोईफोडे, शाम शिंदे, पो.ह. ओमले, मदने, महिला दक्षता समिती सदस्य मिरजकर, तुलसा पवार, किशोरी हिरवे तसेच विद्यार्थीनी उपस्थित होत्या. यावेळी उपस्थित महिलांना सॅनिटरी नॅपकिन्स मोफत वाटप करण्यात आले. पाच रुपयाचा शिक्का या मशीनमध्ये टाकताच सॅनिटरी नॅपकिन मशीनमधून बाहेर येते. या सेवेचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन माणगांव पोलिसांतर्फे करण्यात आले आहे.

## कर्जत मधील आरोग्य शिबिरात १८० जणांची तपासणी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

गजवक्र रियालिटी कंपनीचे संचालक गणेश मुंढे यांनी आयुर हॉस्पिटलच्या सहकार्याने मोफत आरोग्य चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी १८० रुग्णांची तपासणी करण्यात आली आणि त्यांना मोफत औषधे देण्यात आली.

कर्जत मधील विठ्ठलनगर विभागातील गजवक्र कंपनीच्या सभागृहात मोफत आरोग्य चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गजवक्र रियालिटी कंपनीचे संचालक गणेश मुंढे यांच्या हस्ते समारंभाचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी आदित्य सारडा, डॉ. वर्षा बोंबे, प्रितेश बोंबे, ओंकार दळवी आदी उपस्थित होते. या शिबिरात मधुमेह चाचणी, नेत्र तप-ासणी आदी प्रकारची चाचणी करण्यात आली. एकूण १८० जणांची तपासणी करण्यात आली.

आयुर हॉस्पिटलच्या डॉ. वर्षा बोंबे, सायली शिरकार, पूनम पाटील, सागर धनशेट्टी, सागर शेजवळ आदींनी रुग्णांची तपासणी केली. याप्रसंगी राजाभाऊ कोठारी, सतीश श्रीखंडे, प्रकाश शहा, श्रीनिवास अय्यगार, काशीनाथ बैलमारे आदी उपस्थित होते.

## किरवली गावातील अनेक वर्ष रखडलेले रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

किरवली गावातील अनेक वर्ष रखडलेले रस्त्याचे कामाचे अखेर भूमिपूजन संपन्न झाले,किरवली गावातील उपकेंद्र जोड रस्त्यासाठी मा. राजिप उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी कडून २८.५० लक्ष निधी मंजूर केला आहे, नागरिकांना दिलेला शब्द पूर्ण केला आहे सुधाकर घारे यांच्या हस्ते भूमीपूजन संपन्न झाले.याप्रसंगी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कर्जत तालुक्यातील किरवली गाव हे तालुक्यातील प्रमुख गाव असून नगरपरिषद हद्दीला लागून आहे,गेली अनेक वर्ष गावातील रस्ता पूर्णपणे खराब झाला होता, गावतील रस्ता तात्काळ करण्यात यावा ही नागरिकांची वारंवार मागणी होती, सदरील रस्त्याची बाब किरवली गावातील ग्रामस्थांनी सुधाकर घारे यांच्याकडे लक्षात आणून दिले. नेहमी गावातील विकासकामांसाठी अग्रेसर असणारे सुधाकर घारे यांनी तात्काळ ग्रामस्थांना शब्द दिला जिल्हा परिषदेच्या माध्यमातून रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. दिलेला शब्द पाळणारे सुधाकर घारे यांनी तात्काळ किरवली उपकेंद्र जोड रस्त्यासाठी २८.५० लक्ष निधी उपलब्ध करून देऊन नागरिकांची रस्त्याचा प्रश्न मार्गी लावला आहे.



## पनवेल रेल्वे स्टेशन येथून मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वेस्टेशन समोरील रिक्षा स्टँडच्या बाजूला उभी करून ठेवलेली मोटार सायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. शशिकांत पाटील (रा. करंजाडे) याने त्यांची १५ हजार रुपये किंमतीची टीव्हीएस कंपनीची मोटार सायकल पनवेल रेल्वे स्टेशन समोरील रिक्षा स्टँडच्या बाजूला उभी करून ठेवलेली मोटार सायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


मा.श्री.मुजावर साहेब

अॅड.अनिल आर. नागदेवे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६१०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/१२/२०२२

कै.धाऊ जोमा खैर आणि
कै.हिराबाई धाऊ खैर (मयत) यांचे वारस
१) श्री.नाग्या नारायण खैर
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
२) कृष्णा नारायण खैर
वय : ३७ वर्षे, धंदा : शेती
अनु क्र.१ व २ रा.मु.खैरवाडी, पो.मोर्बे,
ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.शिमगी रामा उघडा
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.तामसई, पो.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीमती.माई बुधाजी भगत
वय : ६० वर्षे, धंदा : नोकरी
रा.बोंदरपाडा, दुंद्रे, पो.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.धाऊ जोमा खैर यांचे दि.१५/०४/१९९८ रोजी मु.खैरवाडी, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झालेले आहे. तसेच कै.हिराबाई धाऊ खैर यांचे दि.०१/०४/२०१३ रोजी मु.खैरवाडी, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झालेले आहे. कै.धाऊ जोमा खैर व कै.हिराबाई धाऊ खैर यांना अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत.

सबब अर्जदार यांना वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

तरी अर्जदार यांच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत, तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि जर अर्जदार हे कै.धाऊ जोमा खैर व कै.हिराबाई धाऊ खैर यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास अर्जदाराला वारसदाखला मंजूर करण्यात येईल.

आज दि.१६/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



अॅड.प्रदीप भोईर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१६३४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०१/२०२३

१) श्रीमती.कृष्णाबाई चंद्रकांत गायकर
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पोयंजे, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.रेखा वासुदेव पाटील
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.डायघर, ता.ठाणे, जि.ठाणे अर्जदार
विरुद्ध
१) श्रीमती.आनंदी आंबो वाघमारे
वय : ७२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.जनार्दन आंबो वाघमारे
वय : ४४ वर्षे, धंदा : नोकरी
क्र.१ व २ दोघेही रा.देवद, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.शैला बाळाराम पाटील
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रोडपाली, ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार व सामनेवाला क्र.२ व ३ यांचे वडील आणि सामनेवाला क्र.१ यांचे पती मयत आंबो केंड्या वाघमारे हे दि.०४/०५/२०२२ रोजी मयत झाले आहेत. मृत्यूसमयी मयत आंबो कोंड्या वाघमारे यांचे नावे व सामाईक हिश्श्यात असलेल्या मौजे : भोकरपाडा (चिपळे), ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : भोकरपाडा (चिपळे), ता.पनवेल, जि.रायगड**

| भूमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २६ | १ | १-८५-०० | ३९.२० |

अर्जदार यांनी सदरील चौकशी अर्ज मयत आंबो केंड्या वाघमारे यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.१४/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील श्री.विकास एस. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१६२२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०१/२०२३

१) श्रीमती.शकुन महेश सिंग
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.अमर महेश सिंग
वय : ३४ वर्षे, धंदा : व्यापार
३) सौ.नैना राजकुमार सिंग
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.दिपक महेश सिंग
वय : २९ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.घर नं.१२५, शिवशक्ती नगर,
शिलोत्तर रायचुर, सुकापूर, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.महेश संकठा सिंग रा.घर नं.१२५, शिवशक्ती नगर, शिलोत्तर रायचूर, सुकापूर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड हे दि.२८/०८/२००९ रोजी मौजे : शिलोत्तर रायचुर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.महेश संकठा सिंग यांची आई कै.छबीदेवी संकठा सिंग ह्या ६० वर्षापूर्वीच मयत झालेल्या आहेत. अर्जदार हे कै.महेश संकठा सिंग यांच्या खालील मिळकतीचा दुकानी गाळ्याचा वारस दाखला मिळणेसाठी अर्ज केला तिचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**दुकानी गाळ्याचे वर्णन**

| मिळकतीचे नाव | क्षेत्र | रुपये |
|---|---|---|
| शॉप नं.८, तळमजला, साई निवास को.ऑ.हौ.सो.शिलोत्तर रायचुर, सुकापूर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ | ३७.८ स्क्वेअर फिट बिल्टअप एरिया | २४,५००/- |

वरील अर्जदार हे कै.महेश संकठा सिंग यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.महेश संकठा सिंग यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१४/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.मुजावर सो.कोर्ट

अॅड.नरेश टी. म्हसकर (पनवेल)

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.७०९/२०२१
नि.नं.२४/ड
ने.ता.२३/१२/२०२२

१) श्री.अरुण पंढरीनाथ म्हात्रे
२) श्री.किरण पंढरीनाथ म्हात्रे
३) श्रीमती.लक्ष्मीबाई पंढरीनाथ म्हात्रे
अ.नं.१ ते ३ रा.धाकटा खांदा,
ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.सुजाता सुभाष पाटील
(पुर्वाश्रमीची सुरेखा पंढरीनाथ म्हात्रे)
रा.वायशेत, ता.अलिबाग, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१, २ व ४ यांचे वडील व अर्जदार नं.३ यांचे पती कै. पंढरीनाथ बनूजी उर्फ बनू म्हात्रे हे दि.३१/१२/२०२० रोजी सुरज हॉस्पिटल, सानपाडा, नवी मुंबई येथे मयत झालेले आहेत. तसेच कै. पंढरीनाथ बनूजी उर्फ बनू म्हात्रे यांची आई कै.शांताबाई बनूजी उर्फ बनू म्हात्रे ह्या देखील फार वर्षापूर्वी मयत झाल्या आहेत. कै.पंढरीनाथ बनूजी उर्फ बनू म्हात्रे यांचे सामाईक मालकीच्या मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकती ह्या सिडकोतर्फे संपादीत झालेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.नं. | गावाचे नाव | युनिट केस नं. | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल | ४३१ सी | ५४८ | १ | ०-७२-९ | ६.५७ |
| २ | पनवेल | ४३१ सी | ५५६ | १ | ०-५०-७ | ५.३१ |
| ३ | पनवेल | २४० | ५५६ | १० पै | ०-१८-२ | १.४१ |
| ४ | पनवेल | २१ | ९२ | ४ | ०-०६-६ | १.३६ |
| ५ | पनवेल | २१ | ८९ | ४ | ०-१२-१ | २.२० |
| ६ | पनवेल | २२ | ५९१ | ३ | ०-०५-३ पो.ख. ०-०१-८ | ०.८४ |
| ७ | पनवेल | २२ | ६०२ | ३ | ०-०३-१ पो.ख. ०-००-२ | ०.४७ |
| ८ | पनवेल | २२ | ५६७ | ६ | ०-१९-९ पो.ख. ०-०१-३ | ४.७५ |
| ९ | पनवेल | २२ | ५१७ | ५ | ०-०३-१ पो.ख. ०-००-२ | ०.५३ |
| १० | पनवेल | २१ | ५५६ | ८ | ०-१६-२ | १.६९ |
| ११ | पनवेल | ४३६ | ५४८ | ७ पै | ०-११-५ | १.०६ |
| १२ | पनवेल | - | ५७० | १ | ०-११-३० पो.ख. ०-०१-३० | २.८१ |
| १३ | पनवेल | - | ५७१ | ४ | ०-०२-०० पो.ख. ०-००-५० | ०.४४ |

वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केला आहे. वरील मिळकतीत अर्जदार यांचा कायदेशीर हक्क व अधिकार असल्याने सदर मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.१५/११/२०२२ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## पनवेल ते खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल ते खांदेश्वर रेल्वे स्टेशन कि. मी. नं . ४७/०८ ,४७/०९ जवळ एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याचा नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत .

सदर इसमाचे अंदाजे वय ३५ वर्षीय , उंची ५ फूट ५ इंच , अंगाने मध्यम , उजव्या हातावर ठ त ॠळश्र असे इंग्रजी मध्ये गोंदलेले आहे. तसेच त्याच्या अंगामध्ये निळ्या रंगाचा शर्ट व नेव्ही ब्लु रंगाची फुल पँट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे फोन - ०२२-२७४६७१२२ किंवा पोलीस उपनिरीक्षक डी . एस बदाले मो. नंबर ९५९४९१२२९४ येथे संपर्क साधावा .

## द.ग. तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कोलाडच्या विद्यार्थ्यांचे कबड्डी स्पर्धेत सुयश

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

सन २०२२ -- २०२३ या शैक्षणिक वर्षातील रोहा तालुका स्तरीय क्रिडा स्पर्धा गिताताई तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या क्रिडागण चिंचवली येथे दिनांक ११ नोव्हेंबर २२ ते १२ नोव्हेंबर २२ रोजी संपन्न झाल्या.या कबड्डी स्पर्धेत सु.ए.सो.चे द. ग. तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कोलाड या विद्यालयाने वय वर्षे १४ मुले व वय वर्ष १७ वयोगटातील मुलीच्या व १७ वयोगटातील मुले या तिन्ही गटातील संघाने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

द.ग.तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक कोलाड विद्यालयाचे विद्यार्थी शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर आहेत परंतु विविध क्रीडा क्षेत्रात ही भरारी घेतांना दिसत आहेत. सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात चिंचवली येथील गिताई तटकरे विद्यालयाच्या क्रिडांगणावर झालेल्या तालुका स्तरीय कबड्डी स्पर्धेत तीन वयोगटातील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळवा असून या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य शिरीष येरुणकर सर क्रिडांगणावर उपस्थित राहून क्रिडा शिक्षक दिघेसर व विजयी विद्यार्थी यांचे अभिनंदन केले तसेच त्यांना सहकार्य करणारे शिक्षक सत्वे सर , सानप सर, भेकरे सर, जाडकर सर, तिरमाले सर, अविनाश माळी सर हयाचे ही अभिनंदन केले


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## शिवसेना शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या वतीने गरजवंतांना पेन्शन योजनेचा लाभ



**दै.रायगड नगरी । माथेरान**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या वतीने मीरा फाउंडेशनच्या माध्यमातून येथील

गरजवंतांना मासिक पेन्शन योजनेचा नऊवा हप्ता एकहजार रुपये रोख स्वरूपात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांच्या शिवसेना शाखेत वाटप करण्यात आला.यावेळी चंद्रकांत चौधरी यांच्यासह उप शहरप्रमुख प्रमोद नायक, प्रकाश सुतार, जेष्ठ शिवसैनिक ज्ञानेश्वर बागडे,माजी नगरसेवक संदिप शिंदे, विकास पार्टे, युवा सेनेचे निखिल शिंदे, गौरंग वाघेला, खालिद शेख, अनिकेत जाधव, मयूर चौधरी, अमोल चौगुले, महिला आघाडी कार्यकर्त्या त्याचप्रमाणे अन्य युवा सेना, युवती सेनेच्या पदाधिकारी उपस्थित होत्या. जवळपास १४३ गरजवंतांना प्रत्येकी एकहजार रुपये रोख वाटप करण्यात आले.कोणत्याही प्रकारे प्रसिद्धी न करता अत्यंत साधेपणाने दर महिन्याला चंद्रकांत चौधरी यांच्या वतीने गरजवंतांना,विधवा महिलांना, दिव्यांग, मूकबधिर तसेच निराधार लोकांना याचा लाभ होत आहे. यातून एक सामाजिक बांधिलकी त्याचबरोबर या गावचे आपण ऋणी आहोत त्यामुळेच सढळ हाताने मदत करणे आपले कर्तव्य आहे. ज्यांना या एकहजार रुपयांचा लाभ होत आहे ते गरजू लोक कुणी औषधे तर कुणाच्या घराला आधार यानिमित्ताने प्राप्त होत आहे. ही मदत स्वीकारताना त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आम्हाला आमच्या सामाजिक कार्याला पुढे नेणारा असतो.असे मत चंद्रकांत चौधरी यांनी व्यक्त केले. तर ही निस्वार्थी भावना आणि या मदतीमुळे खरोखरच गोरगरीब लोकांना फायदा होत आहे. अनेक दिग्गज याठिकाणी राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत परंतु आजवर कुणीही याप्रकारे सर्वसामान्य लोकांना मदत केलेली ऐकिवात नाही. त्यासाठी चंद्रकांत चौधरी यांच्या सारखे मोठे मन असावे लागते. त्यांचे हे कर्तृत्व खरोखरच वाखाणण्याजोगे आहे आणि त्यांना या कामात त्यांची पत्नी मीरा फाउंडेशनच्या संचालिका रेखा चौधरी यांचे नेहमीच पाठबळ असते असे माजी नगरसेवक प्रकाश सुतार यांनी व्यक्त केले.

# जेएनपीए व जेएम बक्षी दरम्यान करार : शॅलो वॉटर बर्थ आणि कोस्टल बर्थचे हस्तांतरण

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीएने १५ नोव्हेंबर २०२२ रोजी जेएम बक्षी पोर्ट्स एंड लॉजिस्टिक लिमिटेड सोबत शॅलो वॉटर बर्थचे अपग्रेडेशन सुसज्जीकरण आणि ऑपरेशन व देखभाल करण्यासाठी तसेच कोस्टल बर्थ पीपीपी मॉडेल वर चालविण्यासाठी सवलत करारावर स्वाक्षरी केली. आता जेएनपीए हे भारतातील पहिले १०० टक्के लँडलॉर्ड असणारे बंदर बनले आहे. शॅलो वॉटर बर्थचे नूतनीकरण आणि कोस्टल बर्थचे व्यवस्थापन व संचालन जेएम बक्षी ग्रुपने स्थापन केलेल्या न्हावा शेवा डिस्ट्रिब्युशन टर्मिनल प्रायव्हेट लिमिटेड नावाच्या एसपीव्ही द्वारे केले जाईल.



जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी व उपाध्यक्ष उन्मेश वाघ, यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षरी करण्यात आल्या. यावेळी जेएम बक्षी ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक ध्रुव कृष्ण कोटक आणि जेएनपीएचे सर्व विभागाध्यक्ष होते.

यावेळी बोलताना जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी म्हणाले की , शॅलो वॉटर बर्थ आणि कोस्टल बर्थ आता पीपीपी टर्मिनल असतील, यासाठी जेएम बक्षी ग्रुपने यशस्वी बोली लावली होती. सवलतधारकाने हे टर्मिनल अपग्रेड करणे, सुसज्ज करणे, ऑपरेट करणे, देखभाल करणे आणि ३० वर्षांच्या कराराच्या कालावधीच्या शेवटी हस्तांतरित करणे आवश्यक आहे. टर्मिनल ३ वर्षांच्या एकाच टप्प्यात विकसित केले जाईल. जेएनपीए द्वारा पायाभूत सुविधांचा विकास केला जाईल. जगातील अनेक प्रमुख बंदरे ही लँडलॉर्ड असून फक्त विपणन कार्य करीत आहेत. जेएनपीए सुद्धा आता अधिक सुव्यवस्थित पद्धतीने विपणन कार्य हाती घेणार आहे, प्राधिकरणाने सामान्य बंदर व्यवसायाचा विकास केला आहे.

शॅलो वॉटर बर्थची क्षमता ४ दशलक्ष मेट्रिक टन प्रतिवर्ष असून लांबी ४४५ मीटर आहे, त्यापैकी १२५ मीटर रो-रो टर्मिनल म्हणून विकसित करण्यात आले आहे. या बर्थ वर ३०,००० डीटी पर्यंतच्या जहाजांची हाताळणी केली जाऊ शकते ज्यामुळे हा बर्थ किनारपट्टीवरील तसेच परदेशी मालवाहतूकांसाठी सर्वात पसंतीची सुविधा ठरणार आहे. शॅलो वॉटर बर्थ एक मल्टि-कार्गो टर्मिनल आहे जे कंटेनर, सिमेंट, सामान्य मालवाहू आणि द्रव मालवाहू जहाजे परदेशी आणि किनारी दोन्ही हाताळण्यास सक्षम आहे. या बहुउद्देशीय स्वच्छ कार्गो टर्मिनलचा यूएसपी म्हणजे रो-रो जहाजांद्वारे किनारी भागातील कंटेनर जोडण्याची क्षमता, न्हावा शेवाच्या जल-आधारित लॉजिस्टिक इको-सिस्टीममध्ये क्रांती घडवून हे देशातील सर्वात कनेक्टेड हब बनले आहे.

या बर्थमुळे देशातील दूरस्थ भागात पोहोचण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. भारत सरकार किनारपट्टीवरील मालवाहतुक वाढविण्यावर लक्ष केंद्रित करत आहे आणि उद्योगांना हरित पर्याय शोधत आहेत, अशावेळी ही नवीन पायाभूत सुविधा महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते. जेएनपीए ने किनारपट्टीवरील मालवाहतूकीस चालना एक समर्पित बर्थ प्रदान करण्याच्या दृष्टीकोनातून कोस्टल बर्थ विकसित केले आहे. किनारपट्टी भागात मालवाहतुकीला चालना देण्यासाठी बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाच्या 'सागरमाला' कार्यक्रमांतर्गत या प्रकल्पास अंशतः निधी देण्यात आला होता. कोस्टल बर्थमुळे हरित चॅनेलद्वारे मालवाहतूक सुरळीत आणि जलद होण्यास मदत होईल आणि देशांतर्गत मालवाहतुकीमध्ये किनारी मालवाहतूकीचा वाटा वाढविण्यात मदत होईल आणि तसेच आयात-निर्यात (एदखच्) समुदायाची सोय होईल.

पोलाद, सिमेंट, कंटेनर, खते, अन्नधान्ये आणि काही इतर स्वच्छ कार्गो यांसारख्या प्रतिवर्षी सुमारे २.८ दशलक्ष मेट्रिक टन कोस्टल कार्गो हाताळण्याची क्षमता कोस्टल बर्थमध्ये आहे. मालाची साठवण आणि हाताळणीसाठी बर्थचे बॅकअप क्षेत्र ९ हेक्टर आहे. प्रकल्पाचा एक भाग म्हणून, जेएम बक्षी सिमेंटच्या साठवणुकीसाठी स्वयंचलित मशीनीकृत सिमेंट हाताळणी प्रणाली आणि कनेक्टेड कन्व्हेइंग आणि सायलो सुविधा प्रदान करेल ज्यामुळे जहाज वाहतूक गतिमान व सुगम होईल. नोव्हेंबर २०२० मध्ये पूर्ण झालेल्या कोस्टल बर्थचे उद्दिष्ट किनारपट्टीवरील मालवाहतूकीसाठी उत्तम पायाभूत सुविधा प्रदान करणे आणि रेल्वे व रस्ते मार्गावरील वाहतूकीचा भार कमी करणे तसेच किफायतशीर स्पर्धात्मक आणि प्रभावी मल्टी-मॉडल वाहतूक उपाय सुनिश्चित करणे हे आहे.

## रेवदंड्यातील श्री काळभैरव महाराजांचा ५५ वे वार्षिक उत्सव उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रेवदंडा गावातील गोळास्टॉप येथील श्री काळभैरव महाराज यांच्या वार्षिक उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम करण्यात आले होते. तसेच श्री हरेश्वर मंदिरात भव्य रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

रेवदंड्यातील श्री काळभैरव महाराज उत्सवाची पहाटेची पूजा व अभिषेक जयवंत गोंधळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री काळभैरव मित्र मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. हा उत्सव गेली ५५ वर्षा पासून उत्साहात साजरा करण्यात येत आहे. श्री काळभैरव मंदिरात सायंकाळी भाविकांनी दर्शनासाठी मोठमोठ्या रांगा लावल्या होत्या. तर पूजेसाठी भाविकांकडून गर्दी झाली होती.



उत्सवानिमित्त मंदिरावर आकर्षक रोषणाई फुलांची सजावट करण्यात आली होती. मंदिर परिसरात विविध प्रकारची दुकाने थाटण्यात आली होती. तर दुपारच्या वेळेस महिलांसाठी भव्य संगीत खुर्चीचे आयोजन करण्यात आले होते जवळपास १२० महिलांनी खेळात सहभाग दाखवला होता. सायंकाळी महाप्रसाद, ह.भ.प आठवले बुवा यांचे किर्तन तर ह.भ.प. संदिप मोहिते सोलापूर यांचे भारुडातून समाज प्रबोधन करण्यात आले होते. श्री काळभैरव महाराज उत्सवानीमित्त प्रत्येक वर्षी भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या रांगोळी स्पर्धेचे उद्घाटन चला हवा येवू द्या फेम भालचंद्र कदम यांच्या हस्ते करण्यात आले.

स्पर्धेसाठी अनेक जिल्ह्यातून स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. सतिश जोशी मुरूड जंजीरा, अच्युत चव्हाण मुरूड जंजीरा, अनिरुद्ध खेडेकर नांदगाव, शिवम चव्हाण मुरूड जंजीरा, शरद धुमाळ मुरूड जंजीरा, विनायक नाखवा अलिबाग, कौस्तुभ देवळेकर अलिबाग हे स्पर्धक दर वर्षी सहभाग घेवून आपली कला सादर करतात. श्री काळभैरव मंदिराच्या आवारात हुभेहुब किल्ले रायगडची प्रतिकृती देखील बघायला मिळाली ही प्रतिकृती जयंत शिंदे आणि त्यांचे सहकारी यांनी बनवल्याचे सांगण्यात आले.

श्री काळभैरव मित्र मंडळाचे अध्यक्ष वैभव चुनेकर, भगवान तांबडकर उपध्यक्ष, किरण चुनेकर सेक्रेटरी, वैभव नाईक सह सेक्रेटरी, सुरेंद्र गोंधळी खजिनदार, अंजनीकुमार तांबडकर, राजेश चुनेकर, अमित नाईक, मिलिंद चुनेकर सदस्य उपस्थित होते तर शरद गोंधळी, तुकाराम चुनेकर, यशवंत पिटनाईक सल्लागार उपस्थित होते. या उत्सव-ाचे आयोजन श्री काळभैरव मित्र मंडळ व योगेश्वरी महिला संघटना यांच्या सहकार्याने करण्यात आले होते. यावेळी रेवदंडा पोलीस ठाण्याचे देखील सहकार्य मिळाले असल्याचे दिसून आले. तर रेवदंडा ग्रामस्थांनी आ-पली मोठ्या प्रमाणत हजेरी लावून सहभाग दर्शवून दर्शनाचा लाभ घेतला.

## मधुकर भोईर यांच्या वाढदिवसा निमित्त मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी दिल्या शुभेच्छा



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगर परिषदेचे प्रामाणिक कर्तव्यदक्ष कर्मचारी तथा मुन्सिपल एम्प्लॉय युनियन कार्याध्यक्ष/ उरण नगरपालिका कर्मचारी सहकारी पतपेढीचे अध्यक्ष मधुकर भोईर यांचा ५० वा वाढदिवस उरण नगर परिषदे मध्ये उरण नगर परिषदेचे कर्मचारी अधिकारी वर्गांच्या उपस्थितीत केक कापून मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी उरण नगर परिषदेच्या कर्मचारी अधिकारी वर्गांनी मधुकर भोईर यांना सुख शांती, समृद्धी दीर्घायुष्य लाभो अशी प्रार्थना करत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार यांनीही मधुकर भोईर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.


### निर्लेखित साहित्य विक्रीचा निविदा सुचना

औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेल, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल व यंत्रनिगराणी कार्यशाळा द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल या संस्थांमधील निर्लेखित झालेले निरुपयोगी व भंगार साहित्याची दरपत्रके मागवून विक्री करावयाची आहे. सदरील भंगार साहित्य संबंधित विभागामध्ये ठेवण्यात आलेले असून सदरचे सर्व साहित्य आहे त्या स्थितीत निविदा पद्धतीने विक्री करणे प्रस्तावित आहे. यामध्ये निरनिराळ्या व्यवसायामधील जुन्या व निकामी झालेल्या यंत्रसामुग्री तसेच भंगार व निरुपयोगी साहित्याचे एम.एस.स्क्रॅप, कॉपर स्क्रॅप, ॲल्युमिनियम स्क्रॅप, ट्युब पट्टी स्क्रॅप, कास्टींग जॉब इत्यादी विविध प्रकारच्या बाबी समाविष्ट आहेत. सदर निविदा प्रक्रियेकरिता लिफाफा पद्धतीने निविदा सादर करावयाची आहे. त्यासाठी फक्त जी.एस.टी. (GST) नोंदणीधारक भंगार खरेदीदाराकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत असून ज्या खरेदीखताने दर कमाल असतील अशा पात्र जी.एस.टी. नोंदणीधारक खरेदीकारास भंगार साहित्याची विक्री करण्यात येईल. विक्री करावयाच्या वस्तू संबंधित विभागामध्ये दि.१८/११/२०२२ ते २८/११/२०२२ या कालावधीत सकाळी ११.०० ते ४.०० पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून पहावयास मिळतील. या कालावधी दरम्यान सादर करावयाच्या विहित नमुन्यातील अर्ज प्रति निविदा रु.३००/- (ना परतावा) संस्थेच्या कार्यालयामधून विकत घेता येतील. सदर नमुन्यातील अर्जातील माहिती अचुकपणे निविदेसोबत रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार मात्र) अनामत रक्कम म्हणून जमा करणे अनिवार्य असेल. सदर रक्कमेचा धनाकर्ष, Registrar, Industrial Training Institute Panvel, Dist-Raigad. यांच्या नावाने डी.डी.च्या स्वरुपात करावा. इच्छुक जी.एस.टी.धारक भंगार खरेदीदारांनी वर उल्लेखिलेला विहित नमुन्यातील नमुना अर्ज डि.डी.सह दि.२८/११/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सिलबंद लिफाफ्यात कार्यालयात जमा करावे. संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा व त्यामध्ये फेरबदल करण्याचा पूर्ण अधिकार प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेल हे राखून ठेवीत आहेत.

सदर सिलबंद निविदा दि.२९/११/२०२२ रोजी स.११.०० वाजता समिती सदस्यांमार्फत प्राचार्यांच्या दालनात उघडण्यात येतील.

**सही/-**
**(एम.के.चौधरी)**
**प्राचार्य,**
**औद्योगिक प्रशिक्षण संस्था,**
**पनवेल, जि.रायगड**

क्र.औप्रसंप/भां.ले./निर्लेखन/२०२२-२३/२०४५
दि.१५/११/२०२२
विमाका/कोवि/२०२२-२३/



### पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड**

**कर निर्धारणाबाबत-आक्षेप नोंदविण्यासाठी**

**जाहीर नोटीस**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचतील प्रकरण ८ मधील नियम १०, १३ (१), १४ व १५ (१) अन्वये तसेच महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतीवरील कर अधिनियम १९७९ ला १० (१) अन्वये पनवेल महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता धारकांस / भोगवटा धारकांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम करांधान प्रकरण ८ चे नियम १३ (१), १४ व १५ (१) अन्वये तयार करण्यात आलेल्या आकारणी तपशिल आणि महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या इमारतीवरील कर (पुन्हा अधिनियम करणे)) अधिनियम १९७९ चे कलम १० (१) अन्वये पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतीचे करयोग्य मुल्य व पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील मोठ्या निवासी जागा असलेलया इमारती भुक्षेत्र १५० चौ.मी. पेक्षा जास्त असणारे आणि त्यांचे करयोग्य मुल्य दर्शविणारा सन २०२२-२३ या कालावधीचा कर आकारणी तपशिल संबंधित कार्यालयीन प्रभाग कार्यालय उप प्रभाग कार्यालय व मुख्यालयात दि.१०/१२/२०२२ पर्यंत कामाच्या दिवशी व वेळेत संबंधित धारक / अधिकृत व्यक्तींना उपलब्ध करण्यात आले आहेत, त्यावर हरकत घ्यावयाची असल्यास :-

१) इमारतीचे व जमिनीचे करयोग्य मुल्य चुकीचे नोंदविले असल्यास

२) घर क्रमांक अथवा मिळकत मालकाचे / धारकाचे नाव चुकीचे नोंदविले असल्यास

३) इमारत अथवा जमिनीवर मालमत्ता घर देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नाव चुकीचे नोंदविले असल्यास

४) जमिनी अथवा इमारतीचे भाडेमुल्यात वाढ अथवा घट केली असल्यास

५) इमारत अथवा तिच्या काही भाग पाडून टाकला असल्यास किंवा इमारत अस्तिवात नसल्यास

६) मिळकतीच्या वापरास बदल केला असल्यास

७) इमारतीच्या क्षेत्रफळात वाढ अथवा घट केली असल्यास

केवळ उपरोक्त मुद्यांसंदर्भात हरकत असल्यास, मिळकत ज्या प्रभाग / कार्यक्षेत्रात आहेत त्या क्षेत्राकरिता असलेल्या प्रभाग कार्यालयाच्या पत्यावर प्रभाग क्षेत्र अधिकारी, प्रभाग समिती कार्यालय, पनवेल महानगरपालिका, सहा. आयुक्त (मालमत्ता कर) व मुख्यालय पनवेल महानगरपालिका यांचे नावे विहित मुदतीत कागदोपत्री पुराव्यांसह लेखी अर्ज सादर करावेत. दि.१५/११/२०२२ ते दि.१०/१२/२०२२ नंतर आलेल्या तसेच अन्य स्वरुपातील अन्य ठिकाणी दाखल केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच प्रत्येक मिळकतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करावा. तथापि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान प्रकरण ८ कलम १ ते ४ अन्वये इमारतींचा / मिळकतींच्या मालमत्ता हस्तांतरणाची नोंद करण्याकरिता संबंधित प्रभाग क्षेत्र अधिकारी यांचेकडे विहित नमुन्यातील अर्ज करता येईल.

मा.आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने

**सही/-**
**गणेश शेटे**
**उप आयुक्त (कर)**
**पनवेल महानगरपालिका**